"जिल्हा परिषद संवर्गातील वर्ग-3 व वर्ग-4 कर्मचा-यांच्या अर्ज / पत्रव्यवहाराबाबत."

महाराष्ट्र शासन

# विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

परिपत्रक क्रमांक 2025/विकास (आस्थापना)/आस्था-1/प्र.क्र.34

दिनांक : 11/11/2025

## परिपत्रक

******

**वाचा :-** महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, 1967 मधील नियम (6)

**प्रस्तावना :**

जिल्हा परिषद संवर्गातील वर्ग-3 व वर्ग-4 कर्मचारी यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, 1967 मधील नियम (6) नूसार प्रथमत: त्यांचे निकटचे प्राधिकरणाकडे अर्ज / पत्रव्यवहार करणे बंधकारक केलेले आहे.

:*परिपत्रक*:

महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, 1967 मधील नियम (6) नूसार "जिल्हा परिषद कर्मचारी ज्यांना निकट दुय्यम असेल अशा प्राधिकरणांव्यतिरिक्त अन्य प्राधिकरणांशी संपर्क साधण्यास बंदी - (1) कोणताही परिषद कर्मचारी, त्यांच्या कार्यालयीन कर्मचा-यांच्या संबंधात किंवा जिल्हा परिषदेचा कर्मचारी या नात्याने त्याच्यावर व्यक्तिश: परिणाम होईल असा कोणत्याही बाबीसंबंधात तो ज्याला निकट दुय्यम असेल अशा प्राधिकरणाखेरीज अन्य कोणत्याही वरिष्ठ प्राधिकरणाशी कोणताही थेट पत्रव्यवहार करणार नाही," अशी तरतूद आहे.

*तथापि,* छत्रपती संभाजीनगर विभागांतर्गत जिल्हा परिषदेतील वर्ग-3 व वर्ग-4 कर्मचारी हे उक्त तरतूदीचे पालन करत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामूळे यापूढे जिल्हा परिषदेतील वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गातील कर्मचाऱ्यांना याव्दारे निर्देशित करण्यात येते की, विभागातील वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गातील कर्मचा-यांकडून थेट पत्रव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास अशा कर्मचा-यांविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, 1967 मधील नियम (6) चा भंग केल्याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम, 1964 मधील तरतुदीनूसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

**जितेंद्र पापळकर** (भा.प्र.से.)
**विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर**

**प्रतिलिपी,**

**मुख्य कार्यकारी अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर विभाग** यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक हे आपले जिल्हा परिषदेच्या वर्ग-3 व वर्ग-4 संवर्गातील कर्मचा-यांचे लेखी निदर्शनास आणून देण्यात यावे. तसेच आपले कार्यालयाचे संकेतस्थळावर सदर परिपत्रक कायम उपलब्ध राहील याची दक्षता घ्यावी.

********